प्रकरण सहावे

उपसंहार

प्रकरण सहावे

उपसंहार

''दया पवारांच्या गद्य व पद्य अशा भिन्न स्वरुपातील आत्मकथनांचा (बलुतं व कोंडवाडा) चिकित्सक अभ्यास'' प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. तो अधिकाधिक वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले आहे. हा अभ्यास करताना प्राप्त झालेले निष्कर्ष समग्रपणे या प्रकरणात मांडले आहेत.

''दलित साहित्याचे स्वरुप'' विश्लेषण करताना ''दलित'' या संकल्पनेस अनुसरुन वैचारिक मांडणी केली आहे. दलित साहित्यातील वेदना-विद्रोहातील वास्तवता आणि प्रकट करण्याची सुशिक्षित वर्गाची अनावर इच्छा येथे मांडली आहे. दलित साहित्याच्या जाणीवा, दलित साहित्य म्हणजे काय ? दलित साहित्याचे स्वरुप इत्यादी प्रमुख घटकाचा विचार केला आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात अस्पृश्य समाजामध्ये सामाजिक व शैक्षणिक दृष्टता जागृती घडवून आणण्याचे खूप मोठे कार्य म. फुले, शाहू महाराज, वि. रा. शिंदे, म. गांधी आणि कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी पुरोगामी समाज सुधारकांनी केले. परंतु खऱ्या अर्थाने दलित समाजात नवचैतन्य निर्माण झाले ते डॉ. बाबासाहेब यांच्या क्रांतीकारी विचार व युगप्रवर्तक नेतृत्वामुळे आज दलितांच्या ठिकाणी जाणीव जागृती झाली आहे. दलित साहित्य म्हणजे काय ? हे सांगताना प्रमुख दलित अभ्यासकांच्या व्याख्यांचा आढावा घेतल्या नंतर दलित साहित्याचे स्वरुप विचार करता. वेदनेतून विद्रोहाचा जन्म झाला आहे आणि हा विद्रोह व नकार दलित साहित्याचा अलंकार ठरतो.

''दलित साहित्याच्या प्रेरणा'' या प्रकरणामध्ये साहित्याविषयी आंबेडकरांचे विचार मांडले आहेत. त्यात वैदिक व ब्राह्मणी साहित्यविषयक विचार, संत साहित्य विषयक विचार, आधुनिक मराठी साहित्य विषयक विचार, बौद्ध साहित्य विषयक विचार इत्यादी विषयी आंबेडकरांचे विचाराप्रमाणे मांडले आहे. ज्यावेळी दलित समाज शिकू लागला त्याला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊ लागली. त्यावेळी दलितांनी आपले विचार मांडले आहेत. संपूर्ण दलित साहित्याची प्रेरणा म्हणजे आंबेडकर. आंबेडकर निर्माण झाले नसते तर दलित समाजाला त्यांच्या हक्काची जाणीव झाल नसती. त्यामुळे प्रत्येक दलित लेखकाला आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी ठरले आहेत. म्हणून आंबेडकर हेच दलित साहित्याची मुख्य प्रेरणा आहे.

''कोंडवाडा'' काव्यसंग्रहाचे स्वरुप या प्रकरणामध्ये स्वातंत्र्य पूर्वकाळामध्ये मराठी कविता कशी होती आणि १९६० नंतर मराठी काव्यामध्ये जो बदल झाला. तो म्हणजे दलित काव्याचा एक तेजस्वी स्त्रोत्र उद्‌भवला. कोंडवाडा या काव्यसंग्रहामध्ये जे वेगळेपण आहे ते म्हणजे पवारांनी आत्मकथनपर कविता लिहील्या आहेत. कवीला आलेले जीवनानुभव या ठिकाणी मांडला आहे. कवीने वेदना-विद्रोह मांडत असताना इतर कवी प्रमाणे परखडपणे मांडलेले नसून तो हळूवारपणे मांडलेले आहे. पवारांच्या कवितेत इतर दलित कवीच्या मानाने विद्रोह फारसा आढळत नाही. दलित समाजाला भारतीय समाजव्यवस्थेने माणूस म्हणून जीवन जगू दिले नाही. त्या दलितांच्या वेदना पवारांनी प्रतिनिधिक स्वरुपात मांडल्या आहेत. पवारांच्या प्रतिमा सृष्टीमुळे आणि आर्ततेमुळे त्यांची कविता उत्कट झाली आहे. विद्रोहाच्या जाणिवतेने तिने विचार सौंदर्य प्रकट केले आहे.

''बलुतं आत्मकथनाचे स्वरुप'' या प्रकरणामध्ये दया पवारांचे गाजलेले परंतु तितकेच खळबळजनक जे आत्मकथन त्या बलुत्याचा परामर्श घेतला आहे. सुरुवातीला दलित साहित्यातील आत्मकथनाचा परामर्श घेतला आहे. बलुत्यांचे वेगळेपण सांगत असताना ''बलुतं'' मध्ये इतर आत्मकथनाच्या मानाने लैगिंगतेचे चित्रण अधिक प्रमाणात आले असले तरी ते वास्तवातून आले आहे. दया पवारांच्या वाट्याला ज्या व्यथा, वेदना आलेल्या आहेत. त्याचा परामर्श घेतला आहे. तसेच पवारांनी केलेल्या विद्रोहाची मांडणी केली आहे. दया पवारांनी जे जीवन अनुभवले त्यात वेदना, दु:ख, व्यथा त्यांच्या वाट्याला आल्या आहेत. त्या वेदना प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत. ''बलुतं'' मध्ये व्यक्ती विरुद्ध व्यक्ती, आत्मसंघर्ष आला आहे. तरी व्यक्ती विरुद्ध समाज व्यवस्था हा संघर्ष बऱ्याच ठिकाणी आला आहे. दलित म्हणून उपेक्षेमुळे आलेल्या विषयीचा आत्मसंघर्ष आणि कुटुंबात निर्माण झालेल्या सुन्न करणाऱ्या घटनांनी निर्माण झालेला पराकोटीचा आत्मसंघर्ष या आत्मकथनाला वेगळ्या उंचीवर नेहतो.

''कोंडवाडा व बलुतं'' मधील परस्परपुरकता या प्रकरणामध्ये दोन्ही पुस्ताकामध्ये असणारे साम्य दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. जे अनुभव पवारांनी पद्य रुपात मांडले आहेत तेच गद्य रुपात आले आहेत. काही काव्यपंक्तितून व्यक्त होणाऱ्या वेदना तोच भाग दया पवारांनी आत्मकथनात घेतला आहे. सौदर्यस्थळे या विभागामध्ये विचारसौदर्य, भावसौदर्य, कल्पनासौदर्य, शैक्षणिक विचार, राजकीय विचार इत्यादी आधार घेऊन मांडले आहेत. दया पवार कोणत्याही गोष्टीला विरोध करण्याची ताकद नसल्यासारखे जीवन जगले आहेत. नेहमी दुभंगलेल्या अवस्थेत जीवन जगताना सर्व बलुतंभर दिसतात. ''बलुतं आणि कोंडवाडा'' ही साहित्यिकांची गद्य व पद्य रुपातील वेगवेगळी

आत्मकथने असून ती परस्परपूरक आहेत. काही प्रसंग, काही जाणीवा, काही भूमिका दोन्ही पुस्तकात समान आहेत. परंतु काव्यरूपात कवीचे विचार प्रभाविपणे उमटलेले दिसतात. दया पवारांचे हळवेपण, त्यांच्या व्यथा-वेदना, हळुवार तरल भावना ''बलुतं'' पेक्षा ''कोंडवाडा'' मध्ये परखडतेने जाणवतात. दु:खाचा, भावभावना, विचाराचा झालेला कोंडमाराच ''कोंडवाडा'' मध्ये व्यक्त होताना दिसतो. दया पवार ''बलुतं'' मध्ये व्यक्त होतात ''माणूस'' म्हणून. ''कोंडवाडा'' मध्ये येतात 'कवी' म्हणून दोन्हीही कलाकृती परस्परपूरक असून त्यातून दु:खाचे झाड झालेला एक कवी माणूस आवळत जातो.

संदर्भ- ग्रंथ-सूची

संदर्भ ग्रंथ सूची

१) फडके भालचंद्र - ''दलित साहित्य वेदना आणि विद्रोह'' विद्या प्रकाशन पूणे १९७७

२) कुभोजकर (डॉ) ललिता- ''दलित साहित्य प्रकाशयात्रा'' प्रथमावृत्ती -१९९०

३) फडके भालचंद्र - दलितांची आत्मकथने:काही प्रश्न ''आस्मितादर्श''

४) लिवाळे शरण कुमार - ''भारतीय दलित पँथर'' प्रचार प्रकाशन १९९२

५) जोग (डॉ.)वि.स. - ''मार्क्सवाद आणि दलित साहित्य'' प्रथमावृत्ती संबोधन प्रकाशन मुबई १९८५

६) मेश्राम(प्रा)केशव - ''विद्रोही कतिवा'' कॉटिमेन्टल प्रकाशन प्रथमावृत्ती १९७८

७) मेश्राम(प्रा)योगेंद्र - ''दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते ''दलित साहित्यातील विद्रोह संपल आहे का? प्रचार प्रकाशक कोल्हापूर १९८७ प्रथमावृत्ती

८) बागुल बाबूराव - एक मूलाखत माय मराठी दलित साहित्य विशेषांक १९७५

९) मनोहर यशवंत - दलित साहित्य सिध्दांत आणि स्वरुप प्रबोधन प्रकाशन औरंगाबाद १९७८

१०) खरात शंकरराव - दलित वाङमय प्रेरणा आणि प्रवृत्ती इनामदार बंधु प्रकाशन पुणे १९७८

११) मांडे प्रभाकर - दलित साहित्याचे निराळेपण धारा प्रकाशन औरंगाबाद १९७९

१२) इंगळे वामण - दलित मुक्ती लढा आणि दलित साहित्य कांचन प्रकाशन औरंगाबाद १९७९

१३) कऱ्हाडे (डॉ)सदा - दलित साहित्याच्या निमित्ताने ''सत्यकथा''जुलै १९७०

१४) मुक्तीबोध शरदचंद्र - ''दलित साहित्य सिंह गर्जना साप्ताहीक यवतमाळ जानेवारी१९७६

१५) वानखेडे (डॉ)म.ना. - ''सुड प्रस्थावना लोक वाङमय गृह प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती १९८१

१६) डांगळे (संपादक)अर्जुन - ''दलित साहित्य एक अभ्यास''प्रकाशन महाराष्ट्र राज्य सांस्कृतीक मंडळ पहिली आवृत्ती १९७८

१७) बागुल बाबुराव - ''समाज प्रबोधन'' पत्रिका पुणे, मार्च-एप्रिल १९७१

१८) बागुल बाबुराव - ''जेव्हा मी जात चोरली'' अभिनव प्रकाशन, मुंबई १९७६

१९) ढाले राजा - ''नाकेबंदी ज. वि. पवार, मुक्त छंद प्रकाशन, पुणे १९७६

२०) जोग (डॉ.) वि. स. - ''मार्क्सवाद आणि दलित साहित्य'' संबोधन प्रकाशन, मुंबई १९८५

२१) वानखेडे म. ना. - दलित साहित्य संमेलन नागपूर १९७६ येथील अध्यक्ष भाषण

२२) कुलकर्णी भिमराव - दलित साहित्य संमेलन महाबळेश्वर येथील परिसंवाद १९७०

२३) जाधव रा. ग. - ''निळी पहाट'' श्री. विद्या प्रकाशन पुणे एप्रिल १९७८

२४) कुलकर्णी गो. म. - ''साहित्य दलित आणि ललित'' नूतन प्रकाशन पुणे ऑगस्ट १९७७

२५) कवठेकर बाळकृष्ण - ''दलित साहित्य एक आकलन वाङ्:मयी चर्चा आणि चिकित्सा'' नव साहित्य प्रकाशन बेळगाव ऑगस्ट १९७८

२६) खरात (डॉ.) प्रकाश - ''डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार'' ऋचा प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९९२

२७) सुर्वे नारायण - दलित साहित्य नवे आत्मशोधन लेख विचार भारती (ऑक्टोबर-नोव्हेबर १९९२)

२८) गांजरे (प्रा.) मा. फ. - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे (खंड-दुसरा) १९७४

२९) (संपादक) डांगळे अर्जुन- ''दलित साहित्याचे अदिरुप'' दलित साहित्य वेदना आणि विद्रोह श्री विद्या प्रकाशन पुणे १९७७

३०) कवठेकर (प्रा.) बाळकृष्ण- ''दलित साहित्य एक आकलन'' अजब पुस्तकालय कोल्हापूर प्रथमआवृत्ती १९८१

३१) फडके (डॉ.) भालचंद्र - दलित साहित्याची प्रकाशयात्रा, आनंद प्रकाशन जयसिंगपूर, औरंगाबाद प्रथमावृत्ती १९८०

३२) देशपांडे गो. पू. - ''सत्यकथा'' मार्च १९७३ मुंबई

३३) बिरासदार (डॉ.) वसंत - ''आधुनिक मराठी वाङ्:मयाचा इतिहास'' कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद आवृत्ती ऑगस्ट १९९९

३४) पवार दया - ''कोंडवाडा'' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे तृतीयवृत्ती जुलै १९९४

३५) कसबे मिलिंद (संपादक)- ''दया पवार साहित्यिक माणूस आणि मित्र'' झोत प्रकाशन नारायणगाव, पुणे प्रथमावृत्ती १९९७

३६) खांडगे (प्रा.) भास्कर - ''दया पवारांच्या साहित्याचा अभ्यास'' विमल प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती १९८९

३७) क्षीरसागर उत्तम - ''साहित्याचा कस'' संकेत प्रकाशन औरंगाबाद प्रकाशन १९९४

३८) पवाद दया - ''बलुतं'' ग्रंथाली प्रकाशन दादर, मुंबई सहावी आवृत्ती सप्टेंबर १९९५

३९) धोडगे (डॉ.) रमेश वा. - ''दलित आत्मचरित्रे साहित्य आणि समाज'' मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लिमीटेड पुणे प्रथमावृत्ती १९९२

४०) कुसरे-कुलकर्णी(प्रा.डॉ.सौ.) आरती-''दलित स्वकथने साहित्यरूप'' विजय प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती १९९१

४१) डोळस (डॉ.) वसंत - ''दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप'' दिलीपराज प्रकाशन पुणे प्रकाशन दि. डिसेंबर १९९२

४२) (संपादक) नलगे (प्रा.) चंद्रकुमार- ''दलित आत्मकथन'' सुरेश एजन्सी पुणे द्वितीय पानतावणे (डॉ.) गंगाधर आवृत्ती जानेवारी १९९३

891.461
KAD
T15412